ePaper
सार्वजनिक गणेशोत्सवात ध्वनिक्षेपकाचे निर्बंध हटवले!



| वर्ष - 1 | अंक - 5 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पाकिस्तान ठरतोय डोकेदुखी!
- जरीन कामावर परतली
- लष्कराचा ट्रक दरीत कोसळला!
- सांगलीत जनावरांचे आठवडी बाजार

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 21 ऑगस्ट 2023 | सांगली आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अजित पवारांचे जयंत पाटलांसमोर आव्हान !

## » सांगलीच्या राजकारणात अजित दादाची एन्ट्री ; पक्ष वाढीची घेतली जबाबदारी

। सांगली । महाईन्यूज । प्रदीप लोखंडे।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगलीच्या राजकारणात एन्ट्री केली आहे. स्वतःच्या गटाच्या पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सांगली जिल्ह्याची जबाबदारी स्वतः त्यांनी घेतली आहे. खा. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासमोर त्यांनी आव्हान उभे केले आहे. अजित दादांच्या एन्ट्रीने सांगलीचा बालेकिल्ला जयंत पाटील कायम राखतील की, अजित दादा त्यांना शह देतील हे पाहावे लागणार आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निर्धाराने सांगली जिल्ह्यातील राजकारणात रंगत निर्माण झाली आहे.**



राष्ट्रवादीत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यातील नेतृत्वासाठीची स्पर्धा संपूर्ण राज्याला माहिती आहे. पक्षात आपल्याला मानणारा गट निर्माण करण्यात दोनही नेते यशस्वी झाले आहेत. विरोधी पक्षनेते पदासाठी जयंत पाटील यांची असणारी महत्वाकांक्षा लपून राहिली नाही. तर प्रदेशाध्यक्ष पद मिळावे म्हणून अजित पवारांचे प्रयत्न देखील उघड झाले आहेत. जयंत पाटील हे खा. शरद पवारांचे अत्यंत विश्वासू आहेत. सांगली जिल्ह्यात जयंतरावांनी राष्ट्रवादीचा आपला गट मजबूत केला आहे. जयंतराव म्हणतील तीच पूर्व दिशा आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर खा. शरद पवार यांच्यासोबत जिल्ह्यातील नेत्यांना एकत्रित ठेवण्यात जयंत पाटील यांना यश आले आहे. जिल्ह्यात बालेकिल्ला अभेद्य ठेवण्याचे काम त्यांनी केले. या बरोबरच राज्यात देखील पक्षाची होणारी पडझड त्यांनी रोखली आहे. त्यामुळे आता जयंत पाटील यांनाच अजित पवारांनी थेट आव्हान दिले आहे. सांगली जिल्ह्यातील पक्षवाढीची जबाबदारी घेत जयंत पाटील यांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्यासाठी ते मैदानात उतरल्याचे दिसत आहे.

सांगलीत राष्ट्रवादीचे तीन आमदार आहेत. त्यापैकी वाळवा विधानसभेत स्वतः जयंत पाटील, शिराळा विधानसभेत मानसिंग नाईक तर तासगाव - कवठेमहांकाळ मध्ये सुमन पाटील. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर हे तिघेही खा. शरद पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. त्यामुळे जयंतराव वगळता इतर दोन आमदारांची समजूत काढून आपल्या सोबत आणण्यासाठी अजित पवार प्रयत्न करतील का हे पाहावे लागणार आहे. ते आले नाहीत तर पक्षातील इतर पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन ताकद देण्याचा प्रयत्न अजित पवार करण्याची शक्यता आहे. या बरोबरच इतर पक्षातील नेतेमंडळींना देखील सोबत घेऊन पक्षाची (उर्वरित पान 3 वर)

### विरोधकांच्या साथीने जयंतरावांची मतदारसंघात कोंडी ?

» वाळवा विधानसभा मतदारसंघात जयंत पाटील यांच्या विरोधात विरोधक ताकद निर्माण करत आहे. या मध्ये माजी नगराध्यक्ष निशिकांत पाटील, राहुल महाडिक, सम्राट महाडिक, माजी मंत्री सदाभाऊ खोत, शिवसेनेचे आनंदराव पवार आदींसह अनेकांचा समावेश आहे. मात्र जयंत पाटील यांच्या प्रभावाच्या तुलनेत विरोधकांची ताकद तोकडी पडत आहे. त्यामुळे या मतदारसंघात जयंतराव भरघोस मतांनी निवडून येत आहेत. राज्यात प्रचारानिमित्त फिरू नये यासाठी अजित पवार विरोधकांच्या साथीने जयंत पाटील यांची मतदारसंघातच कोंडी करण्याची शक्यता आहे. यासाठी भाजपा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना तसेच इतर नाराजांची मोट बांधून अजित पवार त्यांना ताकद देतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

---

# अन्यथा आम्हाला कर्नाटकात सामील करून घ्या!

## » पाणी संघर्ष समिती भूमिका : कर्नाटक व महाराष्ट्र राज्य सीमेवर दंडवत घालून शुक्रवारी आंदोलन

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जत विस्तारित सिंचन योजनेच्या कामाची टेंडर न काढल्याने तालुका पाणी संघर्ष समितीचे शेकडो कार्यकर्ते कर्नाटक व महाराष्ट्र राज्य सीमेवर दंडवत घालणार आहेत. शुक्रवारी (दि. २५) हे आंदोलन करण्यात येणार आहे. या वेळी कर्नाटक सरकारला तुमच्या राज्यात समावेश करून घेण्यासाठी साकडे घालण्यात येणार आहे. त्यानंतर उमदी बसस्थानक जवळील नगर विजयपूर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष सुनील पोतदार यांनी दिली आहे.**



तालुका पाणी संघर्ष समितीच्या बैठकीत वरील निर्णय घेण्यात आला यावेळी समितीचे अध्यक्ष सुनील पोतदार, उपाध्यक्ष अनिल शिंदे, निवृत्ती शिंदे, महमद कलाल, चिदानंद संख , तानाजी मोरे, गोपाल माळी, अरविंद मुंगळे, केशव पाटील, तात्या कोळी, रियाज शेख, सिद्धू मडवळे, श्रीमंत परगोंड, कलाप्पा इंगळगी, सागर नागने, आपू कोरे, कामु बालगांव, मलाप्पा परगोंड, आदी उपस्थित होते.

जत तालुक्यातील पाणी प्रश्नावर महाराष्ट्र सरकारने दुर्लक्ष केल्याने आंदोलनाची वेळ आली आहे. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी जानेवारी महिन्यात उमदी येथे भेट देवून समितीच्या बैठकीत जत विस्तारित म्हैसाळ सिंचन योजना अमलात आणून दीड वर्षात जतच्या शेवटच्या गावापर्यंत पाणी आणू, मात्र आपण कर्नाटक राज्यात जाण्याचा विचारही करू नका असे आश्वासन दिले. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी विस्तारित सिंचन योजनेला दोन हजार कोटी रुपये मंजूर केले आणि तत्काळ 981 कोटी रुपयांची टेंडर काढले.

### नगर विजयपुर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

» आता पाण्याचा प्रश्न मिटणार आणि कामाला सुरुवात होणार या आशेने पाहत असताना टेंडर काढून आठ महिने झाले तरी अद्याप कामाला सुरू केली नाही. 9 ऑगस्ट क्रांती दिनी तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. तरीही शासनाचे डोळे उघडायला तयार नाही. त्यामुळे कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर जावून कर्नाटक राज्यात समावेश करावा म्हणून दंडवत घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दंडवत घालण्याच्या कार्यक्रमानंतर उमदी बसस्थानक जवळील नगर विजयपुर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे पोतदार म्हणाले.

# ईडीच्या भीतीनं सहकाऱ्यांनी वाट बदलली

## » भेकड प्रवृत्तीला लोक जागा दाखवतील: शरद पवार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी साथ सोडून भाजपसोबत सत्तेत गेलेल्या सहकाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. शरद पवारांनी यावेळी कुणाचंही नाव न घेता टीका केली. ते महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाच्या वतीने पुणे येथे आयोजित सोशल मीडिया मीट अप कार्यक्रमात बोलत होते.**



या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड देखील उपस्थित होते. आपल्या काही सहकाऱ्यांनी रस्ता बदलला आणि भाजपच्या बाजूला जाऊन बसले, असं शरद पवार म्हणाले. ते सांगताना सांगतात आम्ही राष्ट्रवादीचे आहोत, आमची वैचारिक भूमिका बदललेली नाही. फक्त आत जावं लागेल, ते जावं लागू नये म्हणून निकाल घेतल्याचं सांगतात. याचा अर्थ राजकारणात, समाजकारणात सत्याची साथ सोडून कुणी दमदाटी करत असेल तर त्या रस्त्यानं जायचा निकाल घेतला असेल तर अशा भेकड प्रवृत्तीला सामान्य लोक वेगळ्या ठिकाणी पाठवल्याशिवाय राहणार नाहीत, त्यांची अडचण झाल्याशिवाय राहणार नाहीत,असं शरद पवार म्हणाले. जे लोक गेले त्यांचं म्हणणं असं आहे आम्ही विकासासाठी गेलो याच्यात काही अर्थ नाही. जे लोक गेले आहेत त्याच्यातील बहुतेक लोकांवर केंद्रानं ईडीची चौकशी या ना त्या कारणानं सुरु केली. ईडीची चौकशी सुरु झाल्यावर काही लोक त्याला सामोरं जायला तयार नव्हते, असं शरद पवार म्हणाले. अनिल देशमुख १४ महिने तुरुंगात होते. त्यांनाही बदल करा इकडे या असं सांगण्यात आलं होतं, त्यावेळी त्यांनी वैचारिक भूमिका सोडणार नाही, अशी भूमिका घेतली होती. अनिल देशमुख यांनी भूमिकेत बदल केला नाही, असं शरद पवार म्हणाले.

### भाजपच्या दावणीला जाऊन बसले...

» आज ज्यांनी पक्षांतर केलं, म्हणजे काय केलं आम्ही आता भाजपच्या दावणीला जाऊन बसतो. कुठलाही प्रश्न आला की भाजपच्या बाजूनं बोलावं लागतं, मतदान करावं लागतं. त्यांना एवढचं सांगितलंय, तुमच्या ज्या केसेस आहेत त्यावर आम्ही काही करत नाही. तुम्ही बाजू बदला आणि जर नाही बदलली तर दुसऱ्या जागी पाठवू, असं सांगण्यात आलं आहे. ज्यांना भीतीला तोंड द्यायची तयारी नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. कारवाईच्या भीतीनं आपल्या सहकाऱ्यांनी रस्ता बदलला. ते सांगतात आम्ही राष्ट्रवादीचे आहोत पण आत जावं लागेल म्हणून बाजू बदलली, असं शरद पवार म्हणाले.

# सार्वजनिक गणेशोत्सवात यंदा ध्वनिक्षेपकाबाबतचे निर्बंध हटविले!

## » विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची माहिती

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सार्वजनिक गणेशोत्सवात यंदा २३ ते २८ सप्टेंबर दरम्यान रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वाजवण्यास सवलत दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला आहे. तसेच गौरी विसर्जनाच्या दिवशीही रात्री उशिरापर्यंत ध्वनिक्षेपक सुरू ठेवता येईल, अशी माहिती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली**



गणेशोत्सव, दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी शनिवारी दुपारी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, पुणे शहर पोलिस आयुक्त रितेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रवीण पाटील, उपआयुक्त संदीप गिल व आर राजा, जिल्हा पोलिस अधीक्षक अंकित गोयल, वाहतूक शाखेचे उपायुक्त विजय मगर, विभागीय उपायुक्त वर्षा उंटवाल, जिल्हा क्रीडाधिकारी महादेव कासगावडे आदी उपस्थित होते.

प्रशासकीय बैठकीनंतर डॉ. गोऱ्हे यांनी शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. त्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. प्रशासनाबरोबर चर्चा करून या अडचणींचे निराकरण करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या बैठकीवर शहरातील काही मोठ्या मंडळांनी बहिष्कार टाकला होता. मंडळांच्या प्रतिनिधींना विश्वासात न घेता परस्पर नियम केल्याचा निषेध म्हणून हे प्रतिनिधी बैठकीला गेले नाहीत. शिवसेना (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे) शहरप्रमुख नाना भानगिरे, सहसंपर्कप्रमुख अजय बाप्पू भोसले, युवासेना सचिव किरण साळी, तसेच नीलेश गिरमे, श्रीकांत पुजारी, महिला पदाधिकारी, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबईच्या धर्तीवर सुरक्षिततेच्यादृष्टीने मंडळांना मार्गदर्शन सार्वजनिक गणेश मंडळांनी मागील वर्षी उत्सवासाठी काढलेल्या परवान्यांची मुदत सन २०२६ पर्यंत असल्याने त्यांनी नव्याने अर्ज करू नयेत, मात्र ज्यांनी मागील वर्षी परवानगी घेतली नाही त्यांना नव्याने अर्ज करावा लागेल. नागरिकांनी आपल्या सूचना जिल्हाधिकारी, पुणे महापालिका आणि पोलिस आयुक्त कार्यालय यांच्याकडे द्याव्यात, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले. दहीहंडी सणाला साहसी खेळ म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने मुंबईच्या धर्तीवर सुरक्षिततेच्यादृष्टीने मंडळाला मार्गदर्शनपर प्रात्यक्षिके घेण्याचे निर्देश दिले आहेत, असेही त्या म्हणाल्या.

# कारागृहात काम करणाऱ्या कैद्यांच्या पगारात वाढ

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील कारागृहांत विविध कामे करणाऱ्या कैद्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात (पगार) वाढ करण्यात आली आहे. कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी पगारवाढीचे आदेश दिले असून, यामुळे अकुशल, अर्धकुशल आणि कुशल कैद्यांच्या पगारात अनुक्रमे पाच, सहा आणि सात रुपयांची वाढ झाली आहे.

कारागृहात विविध गुन्ह्यांखाली शिक्षा झालेल्या ठरावीक कैद्यांना सुधारणा आणि पुनर्वसन योजनेंतर्गत विविध उद्योगांत आणि शेतीची कामे दिली जातात. नव्याने काम शिकणारा हा अकुशल, काही प्रमाणात कामे करणारा अर्धकुशल आणि माहितगार कैदी कुशल अशी वर्गवारी केली जाते. त्यानुसार कैद्यांना दैनंदिन कामाचा मोबदला दिला जातो. यापूर्वी अकुशल कैद्याला दैनंदिन कामाचे ४८ रुपये, अर्धकुशलसाठी ६१ रुपये आणि कुशल कैद्याला ६७ रुपये मोबदला मिळत होता.

सरकारच्या निर्णयानुसार दर तीन वर्षांनी कैद्यांच्या मोबदल्यात (पगार) दहा टक्के वाढ करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी कारागृहातील कैद्यांच्या पगारात वाढ करण्याचा आदेश प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे कैद्यांच्या पगारात दैनंदिन पाच ते सात रुपयांची वाढ झाली आहे. याचा सात हजार कैद्यांना लाभ होणार आहे.

विविध उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची ठरावीक कालावधीनंतर महागाई लक्षात घेऊन पगारवाढ केली जाते. त्याच धर्तीवर कारागृहातील उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कैद्यांना पगारवाढ देण्यात यावी, अशी विनंती कैदी प्रशासनाकडे करीत होते. कारागृहात काम करून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्यातून कैदी स्वतःसाठी उपहारगृहातून दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करतात; तसेच स्वतःच्या कुटुंबीयांना अडचणीच्या वेळी पोस्टाच्या माध्यमातून पैसे पाठवतात. काही बंदी मिळालेल्या आर्थिक मोबदल्यातून वकिलांची फी भरतात.

# धान्य, डाळींचे दर वाढले!

## घरगुती खर्च 15 टक्क्यांनी वाढला

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पेट्रोल, डिझेलसह खाद्यतेल ही महाग झाले आहे. महागाईच्या तीव्र झळा सर्वसामान्य नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. त्यात आता पुन्हा घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरचे भाव वाढल्यामुळे किचनचे बजेट कोलमडले आहे.**



हॉटेल तर दूरच, पण घरचे जेवणही महाग झाले, असे म्हणण्याची वेळ सर्वसामान्यांवर येऊन ठेपली आहे. तूर डाळ घरासाठी लागणारा भाजीपाला, कडधान्यांच्या किमतीत गेल्या दोन महिन्यांत १५ ते २० टक्के वाढ झाल्याने सर्वांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे. जून महिन्याच्या तुलनेत आता घराचा किचनचा खर्च साधारण २० टक्क्यांनी वाढल्यामुळे खिशाला झळ बसली आहे. महागाईमुळे हॉटेल चालकांनी खाद्यपदार्थांच्या किमतीत साधारणतः १५ ते २० टक्के वाढ केली आहे. महागाईमुळे खर्च परवडेनासा झाला आहे. हॉटेल व्यावसायिकांनी खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ केल्याने वडापाव पासून ते जेवणाच्या थाळीपर्यंत सर्वच महाग झाले आहे. त्यामुळे हॉटेलचे जेवण आता परवडेनासे झाले असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. सुटीच्या दिवशी चेंज म्हणून अथवा कोणी पाहुणे आल्यास हॉटेलला जाणे आता खिशाला चटका लावणारे ठरत आहे.

> धान्य व कडधान्यात १५ ते २० टक्के वाढ झालेली आहे. तूर डाळ व चना डाळीची मागणी जास्त आणि साठा कमी आहे. पावसाचा परिणाम तसेच आवक घटल्याने भाववाढ होत. डाळींचे दर दिवाळीनंतर कमी होतील.
>
> **- महावीर पाटील,** धान्याचे व्यापारी.

# ट्रॅक्टर, ट्रॉली चोरट्यांकडून नऊ लाखांच्या गाड्या जप्त

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

शहरासह मिरज ग्रामीण, कर्नाटकातून दुचाकी, ट्रॅक्टर ट्रॉली लंपास करणाऱ्या पाचजणांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने जेरबंद केले. या संशयितांकडून पाच गुन्हे उघडकीस आले असून, सात दुचाकीसह ट्रॉली असा आठ लाख ९० हजार रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. बसवराज बाळाप्पा नाईक(वय २४), ओकांर विष्णू नाईक), ओंकार महेश तांदळे सिध्दार्थ पांडूरंग खोत (२१) आणि विश्वजीत गिरजाप्पा खोत (२० दोघेही रा. विठूरायाचीवाडी ता. कवठेमहांकाळ) अशी संशयितांची नावे आहेत. जिल्ह्यातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणत कारवाईचे आदेश पोलिस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी दिले आहेत. त्यानुसार एलसीबीचे पथक मिरज परिसरात गस्तीवर असताना, त्यांना माहिती मिळाली की संशयित नाईक याच्या बोलवाड येथील घरासमोर दुचाकी आहेत. त्यानुसार पथकाने जावून शोध घेतला त्यात नाईक याच्या घरासमोर दुचाकी आढळल्या. याबाबत त्याला समाधानकारक माहिती देता आली नाही. पोलिसांनी विश्वासात घेऊन माहिती घेतली त्यात शहरातील भारती रूग्णालय, अहिल्यानगर चौक आणि इतर परिसरातून दुचाकी लंपास केल्याचे सांगितले.

याच पथकास संशयित ओंकार तांदळे हा चोरी केलेली दुचाकी विक्रीसाठी म्हैसाळ पुलाजवळ थांबल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई केली त्यात म्हैसाळ येथून दुचाकी चोरल्याची कबुली संशयित तांदळे याने दिली. विठूरायाचीवाडी येथील विश्वजीत खोत व सिध्दार्थ खोत यांनी एक ट्रॅक्टर व ट्रॉली चोरून आणल्याची माहिती पथकाला मिळाली होती. पथकाने खोत याच्या वस्तीवर जावून पाहणी केली असता, संशयित पळून जाण्याच्या तयारीत होते.

# ऊसाला प्रतीटन ३५०० रुपये दर निश्चित करा

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

शेतकरी संघटनेने ऊस नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष व राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांचेकडे २०२२-२३ हंगामात कारखान्यांकडे गळीतास गेलेल्या ऊसाला प्रतीटन तीन हजार ५०० रुपये दर ठरवण्याची मागणी केली आहे. या मागणीचे निवेदन कोल्हापूरचे प्रादेशिक साखर सहसंचालक अशोक गाडे यांना संघटनेतर्फे निवेदनही दिले. शेतकरी संघटना सहकार आघाडी प्रमुख संजय कोले, रामचंद्र कणसे, किसन पाटील, शंकर कापसे, मोहन परमने, आप्पा हरताळे, हिंदुराव अस्वले, हणमंत कणसे, दयाभाऊ कांबळे यांच्या शिष्टमंडळाने मागण्याचे निवेदन देण्यात आले.

## अजित पवारांचे जयंत पाटलांसमोर आव्हान!

(पान 1 वरून)

ताकद वाढविण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या रोखठोक कामाची पद्धत राज्याला माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या याच प्रभावाची छाप ते सांगली जिल्ह्यात पाडतील की जयंत पाटील यांच्या करेक्ट कार्यक्रमाच्या नीतीचा अनुभव घेतील हे पाहावे लागणार आहे.

**अजित पवार गटाच्या मंत्र्यांची जबाबदारी -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ मंत्री आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष, खासदार यांच्यावर राज्यातील ३६ जिल्ह्यांची पक्ष संघटना वाढीकरीता जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर पुणे, सातारा, सांगली व सोलापूर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्यावर भंडारा, गोंदिया, वर्धा, अमरावती, व नागपूर, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्यावर नाशिक, मुंबई शहर व मुंबई उपनगर, दिलीप वळसे पाटील यांच्यावर अकोला, वाशीम, छत्रपती संभाजीनगर व बुलढाणा, हसन मुश्रीफ यांच्यावर कोल्हापूर, सिंधुदुर्ग, व अहमदनगर, धनंजय मुंडे यांच्यावर बीड, परभणी, नांदेड, व जालना, संजय बनसोडे यांच्यावर हिंगोली, लातूर, व उस्मानाबाद, अदिती तटकरे यांच्यावर रायगड, रत्नागिरी, ठाणे, व पालघर, अनिल पाटील यांच्यावर जळगाव, धुळे, व नंदुरबार, धर्मरावबाबा आत्राम यांच्यावर गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# सांगलीत टोमॅटो दराची लाली उतरली

## ग्राहक समाधानी शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**टोमॅटोचा दर १०० ते १२० रुपये किलोपर्यंत गेल्यामुळे ग्राहक खूपच नाराज झाले होते. पण, महिनाभरातच टोमॅटोचे दर निम्म्यावर आले असून गुरुवारी सौद्यात प्रति किलो २५ ते ३५ रुपये दर मिळाला आहे. तसेच, सांगलीत किरकोळ विक्री ४० ते ६० रुपये किलो दर होता. या दरामुळे ग्राहक समाधानी असला तरी शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर आहे.**



> टोमॅटोला १०० ते १२० रुपये दर मिळत होता. पण, सध्या आवक वाढल्यामुळे प्रतिकिलो सौद्यामध्ये २५ ते ३५ रुपये दर मिळाला आहे. किरकोळ विक्रेते ग्राहक पाहून विक्री करत आहेत. आठवडा बाजारात ४० ते ६० रुपये किलोला सरासरी दर मिळत आहे.
>
> **- मनोज गाजी,** कृषी सल्लागार

राज्यात २२ डिसेंबर ते २३ फेब्रुवारीपर्यंत टोमॅटोचे दर ६ ते ९ रुपये किलो दरम्यान होते. मार्च महिन्यात टोमॅटोचे दर ११ रुपये प्रति किलो होते. तर, एप्रिलमध्ये ते पुन्हा १० रुपये किलोपर्यंत होते. कमी किमतीमुळे टोमॅटो उत्पादकांचे नुकसान झाले. विलंब झालेल्या पावसामुळे नवीन गाठली होती. लागवड कमी झाली. डिसेंबर २०२२ ते मे २०२३ या कालावधीत शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी अत्यंत कमी दर मिळाला. पाऊस कमी झाल्यामुळे नवीन टोमॅटो पिकाची लागण झाली नाही.

जुलै महिन्यात टोमॅटोचे दर वाढले किलोसाठी दराने केव्हाच शंभरी होती. टोमॅटोच्या दरांमध्ये अचानक वेगाने झालेल्या वाढीला कमी पुरवठा हेही एक कारण होते.

पण, सध्या सौद्यामध्ये टोमॅटोला प्रति किलो २५ ते ३५ रुपये दर मिळाला आहे. सांगलीत आठवडा बाजारात टोमॅटोची किरकोळ विक्री प्रतिकिलो ४० ते ६० रुपयांनी चालू होती.

# भविष्याची आशा की भीती?




**एक हजार वर्षांच्या गुलामगिरीचा अंत होत आहे आणि वैभवशाली अशा पुढील एक हजार वर्षांचा प्रारंभ होत आहे, असे आपले पंतप्रधान यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात म्हणाले. वरवर पाहता, ते ज्या ठिकाणी उभे होते त्याच ठिकाणी आणि त्याच क्षणी या दोन हजार वर्षांची भेट झाली. त्या क्षणाचा मी साक्षीदार नव्हतो याचे मला वाईट वाटले.**

मात्र, मी एका दैनंदिन, सामान्य घटनेचा साक्षीदार होतो. पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी इंडिया टुडेवरील त्यांच्या कार्यक्रमात जयंत सिन्हा (भाजप) आणि शशी थरूर (काँग्रेस) या दोन खासदारांना समोरासमोर आणले होते. आणि त्यांच्या समोर प्रेक्षक म्हणून होते, महाविद्यालयीन विद्यार्थी. या प्रेक्षकांनी त्या दोघांना बरेच प्रश्न विचारले. 'इंडिया अॅट हंड्रेड' हा तो कार्यक्रम. त्यात या दोन पाहुण्यांच्या सुरुवातीच्या विधानांनी माझी उत्सुकता वाढवली. जयंत सिन्हा यांनी २५ वर्षांनी म्हणजे २०४७ पर्यंत शाश्वत समृद्धी व्हावी अशी इच्छा व्यक्त केली. शशी थरूर यांनी २०४७ पर्यंत सर्वसमावेशक भारत व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. यामुळे माझ्या मनात असा प्रश्न उपस्थित झाला, की आपण हे दोन्ही का करू शकत नाही? आपापल्या पक्षाची भूमिका मांडू पाहणाऱ्या या दोन खासदारांचे म्हणणे ऐकून, मला



असे वाटले की कदाचित भारतात या दोन्ही गोष्टी असू शकत नाहीत. असे मनात येणेदेखील खरेतर यातनादायक होते. या लेखात, मी सिन्हा यांच्या भारतीय राज्यघटनेचे संरक्षण आणि जतन करण्याच्या इच्छेचा शोध घेऊ इच्छितो. धर्मनिरपेक्षता, भारतीय संघराज्य आणि मानवी हक्कांचे संरक्षण या मूल्यांना त्यांचे पूर्ण समर्थन आहे. कायद्याचे राज्य कायम राखण्याचे आणि या जबाबदारीची अंमलबजावणी करण्याचे वचनही त्यांनी या कार्यक्रमात दिले. राजदीप यांच्या थेट प्रश्नाला, सिन्हा यांनी नि:संदिग्धपणे उत्तर दिले की, 'होय, सगळ्यांना हवे त्याच्याशी लग्न करण्याचा, हवे ते खाण्याचा आणि हव्या त्या धर्माची उपासना करण्याचा अधिकार आहे.' पापणीही न लववता त्यांनी ठामपणे सांगितले की "आमच्या पक्षात आम्ही आमचे मतभेद निखालसपणे व्यक्त करू शकतो. मी माझ्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली आहे आणि मला ज्या गोष्टी चिंतेच्या वाटतात, त्यांच्यावर चर्चा केली आहे." २०४७ मध्ये त्यांच्यासाठी सर्वात महत्त्वाचे काय असेल या प्रश्नावर, सिन्हा म्हणाले, "स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्य". या कार्यक्रमात सिन्हा जे बोलले त्यावर त्यांचा स्वत:चा खरोखर विश्वास आहे, असे मला वाटते. दुसऱ्याच दिवशी आपला ७७ वा स्वातंत्र्य दिन झाला. त्या कार्यक्रमात आपले पंतप्रधान ९० मिनिटे बोलले. मी त्या भाषणाचा इंग्रजी अनुवाद वाचला. थोडक्यात, ते 'मी, मला आणि माझे' अशा स्वरूपाचे भाषण होते, त्यात अनेक विचारांची खिचडी होती. गेल्या ९-१० वर्षांमध्ये जे काही साध्य झाले, असे त्यांना वाटत होते, त्याचे गुणगान होते. एव्हाना त्यांच्या भाषणाची शैली सगळय़ांना नीट माहीत झाली आहे. त्यांनी नेहमीप्रमाणे भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरणावर हल्ला चढवला. त्यांचे लक्ष्य कोण असते हेदेखील आता सगळय़ांना माहीत झाले आहे. ते अनुक्रमे विरोधी पक्षनेते, गांधी परिवार आणि मुस्लिमांच्या विरोधात बोलतात. त्यानंतर हे भाषण निवडणुकीच्या सभेतील भाषण होत गेले. खरे सांगायचे तर गेल्या ९-१० वर्षांत काहीही बदललेले नाही. आता आपण सिन्हा यांच्या विधानांकडे परत जाऊ आणि पंतप्रधानांच्या भाषणाशी त्यांची पडताळणी करून बघू. सिन्हा तरुण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना धीर देत होते की २०४७ हे स्वातंत्र्याचे शंभरावे वर्ष हा आपला सुवर्णकाळ असेल. परंतु सिन्हा यांनी विद्यार्थ्यांसमोर ज्या गोष्टींचे वचन दिले होते, त्या कोणत्याही गोष्टीचा पंतप्रधानांनी उल्लेख केला नाही. राज्यघटनेचे संरक्षण किंवा संवर्धन; धर्मनिरपेक्षता, भारताचे संघराज्य किंवा मानवी हक्कांचे संरक्षण; कायद्याचे राज्य राखणे; आणि उत्तरदायित्वाची अंमलबजावणी या सिन्हा यांनी दिलेल्या आश्वासनाबाबतचा एक शब्दही पंतप्रधानांच्या भाषणात नव्हता. अर्थातच, सिन्हा आणि आपले माननीय पंतप्रधान १५ ऑगस्ट २०२३ रोजी 'सुरू झालेल्या' सहस्रकाची वेगवेगळी चित्रे रंगवत होते. आता, वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या आणि समाजमाध्यमांवर दररोज जे येते, त्यासोबत सिन्हा यांच्या विधानांची पडताळणी करू या. तरुण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या कोणाशीही लग्न करण्याचा अधिकार असेल.

## संपादकीय »

### बाप बाप असतो

***कोरोनानंतर व्यावसायिक सिनेमा झपाट्यानं बदलतोय. दर सिनेमागणिक स्टारडमच्या व्याख्या बदलतायत.***

कालचा स्टार आज शिळा होतोय, तर आजच्या स्टारला पुन्हा चमकण्यासाठी अवाढव्य बजेटच्या कुबड्या लागतायत. या सगळ्या कोलाहलात आपणच या व्यावसायिक सिनेसृष्टीचे खरे बाप आहोत, हे काही जुने स्टार छातीठोकपणे दाखवून देतायत. 'गदर २' आणि 'जेलर'ला मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद हेच सांगतोय. ऑगस्टमधला गेला वीकेंड हा व्यावसायिक सिनेमांसाठी वरदानच ठरलाय. कमाईच्या अनेक वेगवेगळ्या विक्रमांनी या आठवड्यात तिकीटबारी गाजवली. साधारणतः मोठमोठ्या सिनेमांना एकत्र रिलीज झाल्याने फटका बसताना दिसतो. पण गेल्या आठवड्यात आमनेसामने रिलीज झालेल्या 'गदर २', 'जेलर' 'ओएमजी २' आणि 'भोला शंकर' या चारही मोठ्या सिनेमांनी दणक्यात कमाई केलीय. त्यातही 'गदर २' आणि 'जेलर'ला प्रेक्षकांचा मिळणारा प्रतिसाद अक्षरशः अद्भुत आहे. स्टारडमच्या प्रस्थापित व्याख्यांना सुरुंग लावत या सिनेमांनी आपलं वर्चस्व तिकीटबारीवर जमवलंय.

**मणिपूरमध्ये हिंसाचार प्रदीर्घ काळ सुरू आहे. लूटमार, जाळपोळ, लैंगिक अत्याचार, महिलांवर सामूहिक बलात्कार आणि हत्यांनी सर्वांना हादरवून सोडले आहे. पोलिसांची शस्त्रास्त्रेही या दंगेखोरांच्या हातून सुटलेली नाहीत. दारूगोळा, एलएमजी, एसएलआरएस यांसारख्या स्वयंचलित शस्त्रांसह हजारो शस्त्रे चोरीला गेली आहेत. हे सगळे गुन्हे असे आहेत म्हणून भयावह आणि विध्वंसक नाहीत.**

## कसा असेल मणिपूरमधला तपास?

तेथील अंतर्गत कलहाची तीव्रता सध्या काही प्रमाणात कमी झालेली दिसते. पोलीस अधिकाऱ्यांना सार्वजनिक सुव्यवस्थेच्या कामातून मागे घेऊन तपासाला सुरुवात करण्याची हीच वेळ असते. अनेक महिने जास्त काम करणाऱ्या आणि दररोज दंगलखोर जमावाचा सामना करणाऱ्या, अधिकाऱ्यांना तपासाच्या मानसिकतेत शिरण्यासाठी वेळ लागतो. मणिपूरमधल्या पोलीस अधिकाऱ्यांना तर सहा हजारांहून अधिक गुन्हेगारी प्रकरणांच्या तपासाचे अवाढव्य काम करायचे आहे. त्यापैकी काही गंभीर प्रकरणे तपासासाठी सीबीआयकडे जातील. परंतु कायद्याच्या दृष्टिकोनातून गंभीर नसलेल्या, पण पीडितांच्या तसेच इतर लोकांच्या दृष्टिकोनातून अत्यंत गंभीर असलेल्या प्रकरणांचे काय? दोषसिद्धीचा दर ६० टक्क्यांहून अधिक असलेली सीबीआय अनेक मर्यादा असतानाही चांगल्या प्रकारे



तपास करते. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्याकडे तपासासाठी मर्यादित संख्येने प्रकरणे दिली जातात. सीबीआयच्या अधिकाऱ्यांना अगदी प्रत्येक टप्प्यावर योग्य कायदेशीर सल्ला आणि नवी दिल्लीतील केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेची सेवा मिळू शकते. मणिपूर पोलिसांना अशा सगळ्या सुविधा मिळणे शक्य नसले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे त्यांना इतर राज्यांतील पोलीस संघटनांकडून काही मदत मिळू शकते. एफआयआर नोंदवण्यापासून तपासाला सुरुवात होते. बऱ्याच प्रकरणांमध्ये, विशेषत: मणिपूरसारख्या हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये, तपास अधिकाऱ्याला तक्रारकर्त्यांच्या पूरक साक्षींची नोंद करणे आवश्यक असते. भावनिक आघाताला सामोऱ्या जाणाऱ्या फिर्यादीला सुरुवातीच्या काळात असे महत्त्वाचे तपशील देता येतातच असे नाही. त्यानंतर अधिकारी घटनास्थळी जातो आणि आकृती किंवा नकाशा काढतो. महाराष्ट्रात त्याला 'घटनास्थळी केलेला पंचनामा' म्हटले जाते. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले जातात. त्यात अनेकदा अनेक विरोधाभास असतात. तपासकर्ता तो गुंता सोडवण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर येतात ते आपापल्या स्वारस्यानुसार गुन्ह्याचे गांभीर्य वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणारे साक्षीदार. मणिपूरमध्ये नेमके काय घडले, ते शोधण्याचे पोलिसांचे काम अधिक आव्हानात्मक करणारे असे अनेकजण असतील याची मला खात्री आहे. २०२० मध्ये झालेल्या दिल्ली दंगलीनंतर नेमल्या गेलेल्या नागरिकांच्या समितीत माझाही समावेश होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विरोधकांच्या भेटीतून अजितदादांना 'अल्टिमेटम';
# विकासकामांच्या नावाने सत्ताधाऱ्यांशी 'सलगी'!

## राजकारण : राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या दुहेरी भूमिका

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतलेल्या दुहेरी भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासुन आमदार अण्णा बनसोडे सातत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात आहेत. तर विकासकामांच्या नावाखाली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी भेटून 'सलगी' कायम ठेवत आहेत. दुसरीकडे, माजी आमदार विलास लांडे भाजपाच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेत आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर खा. शरद पवार व जयंत पाटील यांच्या संपर्कात आहेत. तर आपले पुत्र माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटासोबतच ठेवत आहेत.**





पिंपरी आणि भोसरी मतदारसंघातील हे दोनही नेते राजकीय डावपेच आखताना दिसत आहेत. एका बाजूला विरोधकांच्या भेटीतून अजित दादांना'अल्टिमेटम' देत आहेत. तर दुसऱ्या बाजूला दादांची नाराजी नको म्हणून विकासकामांच्या नावाखाली 'सलगी' देखील ठेवली जात असल्याचे चित्र आहे.

पिंपरी विधानसभेत पक्षातीलच नेत्यांकडून अडचणी आणण्याचे काम केले जात असल्याचे लक्षात येताच आमदार अण्णा बनसोडे यांनी आतापासूनच सावध पवित्रा घेतला आहे.

ग्राऊंड रिपोर्ट

गतवेळच्या विधानसभा निवडणुकीत संघर्ष केल्यानंतर ऐनवेळी तिकीट मिळाले होते. यंदा तिकीट मिळेल किंवा नाही याची शाश्वती नसल्याने आमदार बनसोडे यांनी पर्यायी सोय करण्यासाठी पाऊले टाकली होती. भाजपा शिवसेना युतीमध्ये पिंपरी मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला सोडला जाण्याची शक्यता आहे. हे गृहीत धरून आमदार अण्णा बनसोडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क वाढविला. शहराच्या दौऱ्यावर आलेले असताना आपल्या जनसंपर्क कार्यालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलाविल्याने अनेकांच्या राजकीय भूमिका उंचावल्या होत्या. आमदार बनसोडे यांच्याकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना हा सूचक इशाराच दिला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र सध्या अजित पवारच राज्याच्या सत्तेत आल्यामुळे आमदार बनसोडे यांनी सावध पवित्रा घेत त्यांच्याशी सलगी पुन्हा घट्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

विविध विकासकामे घेऊन सातत्याने दादांच्या ते संपर्कात राहत आहेत. दुसरीकडे] मुरब्बी राजकारणी म्हणून ओळख असलेले माजी आमदार विलास लांडे यांनी राष्ट्रवादीच्या फुटीनंतर आपली भूमिका 'नरो वा कुंजरो वा' ठेवली आहे. ते खा. शरद पवार यांच्या बाजूचे की उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाजूचे हे स्पष्ट केलेले नाही. राजकीय निर्णयाची गुप्तता पाळण्यात लांडे यांचा हातखंडा आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर खा. शरद पवार यांची भेट घेऊन आम्ही तुमच्या सोबत असल्याचा संदेश त्यांनी दिला. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचे अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासोबत पुत्र विक्रांत लांडे यांना ठेऊन तुमच्या सोबत देखील असल्याचे त्यांनी दाखविले आहे. या बरोबरच गेल्या काही दिवसांपासून लांडे भाजपाच्या नेत्यांना विविध कामे घेऊन भेटत असल्याची चर्चा आहे. केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी देखील ते सातत्याने भेटत आहेत. मात्र मी माझ्या महाविद्यालयाच्या कामानिमित्त भेटत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादीच्या या दोनही मातब्बर नेत्यांनी राजकीय बॅलन्स सांभाळला असला तरी एका बाजूला अल्टिमेटम तर दुसरीकडे वैयक्तिक सलगी जोपासल्याचे दिसते.

### दादांची भूमिका संयमाची की वेळेची वाट पाहण्याची ?

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या पक्षातील नेत्यांविषयी उघड भूमिका जाहीर केलेली नाही. माध्यमांसमोर बोलताना सर्व नेते आपल्या सोबत असल्याचे ते वारंवार सांगत आहेत. एखाद्या कार्यक्रमात पदाधिकारी अनुपस्थित राहिला तरी ते नाराजी उघड करताना दिसत नाहीत. एखाद्या भूमिकेवर कडक प्रतिक्रिया देणारे दादा पदाधिकाऱ्यांच्या दुहेरी भूमिकेवर शांत कसे? असा प्रश्न नागरिकांना पडत आहे, दादांची भूमिका संयमाची आहे की वेळेची वाट पाहुन ऐनवेळी जागा दाखविण्याची आहे हे पाहावे लागणार आहे.

---

# पिंपळे सौदागरमधील आठवडे बाजार स्थलांतरित!

## शत्रुघ्न काटे यांचा निर्णय : वाहतूक कोंडींच्या समस्या मार्गी लावली

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे सौदागर मधील गोविंद – यशदा चौक रोडवरील शेतकरी आठवडे बाजार हा गोविंद यशदा चौक लिनियर गार्डन लगतच्या सर्विस रोडवर स्थलांतरित करण्यात आलेला आहे. आठवडे बाजारमुळे नागरिकांना होणारी वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेत माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी हा निर्णय घेतला आहे.**



यापुढे जे कोणी विक्रेता फुटपाथवर आपली गाडी लावेल त्यावर पालिका अतिक्रमण विभाग मार्फत सक्तीची कार्यवाही करण्यात येणार आहे. पिंपळे सौदागरमध्ये सर्वात प्रथम लोकांना थेट शेती माल आणि भाज्या मिळाव्यात ह्या उद्देशाने माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शेतकरी आठवडी बाजाराची सुरुवात केली. त्यानंतर ह्याच परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी अनेक आठवडी बाजार सुरू झाले. सध्या पिंपळे सौदागर मध्ये ट्रॅफिकचा प्रश्न सर्वच ठिकाणी भेडसावत आहे. पिंपळे सौदागर परिसरात आयटीयन्स प्रमाण जास्त असल्याने मुख्यतः शनिवार आणि रविवारी नागरिक बाजारहाट करण्यासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडतात. ज्याच्यामुळे रस्त्यावर रहदारीचे प्रमाण वाढते. यावर उपाय काढणे गरजेचे होते.

तसेच कठोर निर्णय घेणे अत्यावश्यक आहे म्हणून शत्रुघ्न काटे यांनी याची सुरुवात स्वतः पासून केली असून त्यांनी स्वतःहून सुरू केलेल्या शेतकरी आठवडे बाजार मुख्य रस्त्यापासून बाजूला घेऊन गोविंद यशदा चौकात होणारी वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आणि ह्यामुळे नक्कीच सर्व सामान्य नागरिकांना येथील प्रवास सोईस्कर होणार आहे.

### आयोजकांना केले आवाहन...

» परिसरात सुरू असलेले इतर शेतकरी आठवडे बाजाराचे आयोजन करणाऱ्या प्रमुखांनी सुध्दा जर नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या प्रमाणे पुढाकार घेत आपापले आठवडे बाजार जर मुख्य रहदारी असलेल्या ठिकाणापासून दुसरी कडे स्थलांतरित केले तर नक्कीच परिसरातील वाहतूक कोंडीच्या समस्येवर मात करता येईल. नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी उचललेल्या या पाऊलमुळे गोविंद चौक ते काटे पेट्रोल पंप या रस्तावर वाहतूक कोंडी राहणार नाही तसेच नागरिकांनी आपली वाहने पार्किंगला लावून सहकार्य करावे व आठवडे बाजाराचा लाभ घ्यावा असे आवाहनही केले आहे.

# चीनच्या सैन्याची लडाखमध्ये घुसखोरी!

## » स्थानिकांशी चर्चेनंतर राहुल गांधींचा दावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी सध्या लडाख दौऱ्यावर आहेत. पँगॉन्ग लेकवर राहुल गांधी यांनी त्यांचे वडील आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. तसेच या भागात राजीव गांधी यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या प्रार्थना सभेला राहुल यांनी हजेरी लावली. प्रार्थना सभेनंतर राहुल गांधी यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली.**



यावेळी राहुल गांधी म्हणाले, मला इथल्या लोकांनी सांगितलं, चीनचं सैन्य भारतीय सीमेत घुसलं आहे. दुसऱ्या बाजूला आपलं सरकार आणि आपले पंतप्रधान दावा करत आहेत की आपली एक इंचही जमीन गेलेली नाही.

राहुल गांधी म्हणाले इथले लोक त्यांच्या गायी-म्हशींना ज्या ठिकाणी चरण्यासाठी घेऊन जात होते ती जमीन (चरई क्षेत्र) चीनने बळकावली आहे. त्यामुळे हे लोक तिकडे त्यांची जनावरं नेऊ शकत नाहीत. लडाखमध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आणि महागाई वाढली आहे. परंतु, जनतेचं गाऱ्हाणं सरकार ऐकत नाही, आम्ही ते ऐकून घेऊ. यावेळी राहुल गांधी यांनी त्यांचे वडील दिवंगत राजीव गांधी यांचं स्मरण केलं. ते म्हणाले, माझे वडील हे माझ्या महान शिक्षकांपैकी एक होते. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी राहुल गांधी यांना लडाखला येण्याचं कारण विचारलं, त्यावर राहुल गांधी म्हणाले, भारत जोडो यात्रेदरम्यान, मला लडाखला जायचं होतं, परंतु, काही कारणास्तव ते शक्य झालं नाही. त्यामुळे मी आत्ता इथे आलो आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, लडाखमधील नागरिकांच्या सरकारविरोधात अनेक तक्रारी आहेत. त्यांना दिलेल्या दर्जामुळे ते खूश नाहीत. लडाखच्या जनतेला प्रतिनिधित्व हवं आहे. त्यांना वाटतं की त्यांचा हा प्रदेश नोकरशहांनी नव्हे तर जनतेने चालवावा, त्यांच्या प्रतिनिधिंनी चालवावा. राहुल गांधी म्हणाले, तुम्ही इथल्या कुठल्याही व्यक्तिला विचारा, ते सांगतील की चीनचं सैन्य भारताच्या हद्दीत घुसलंय. त्यांनी आपली जमीन हिसकावली आहे. पंतप्रधान म्हणतायत की आपली एक इंचही जमीन गेलेली नाही, परंतु ते सत्य नाही. इथले लोक काय म्हणतायत ते तुम्ही ऐका. तुम्ही इथल्या कोणालाही विचारू

### नागरिकांच्या सरकारविरोधात तक्रारी

» राहुल गांधी यांनी त्यांचे वडील दिवंगत राजीव गांधी यांचं स्मरण केलं. ते म्हणाले, माझे वडील हे माझ्या महान शिक्षकांपैकी एक होते. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी राहुल गांधी यांना लडाखला येण्याचं कारण विचारलं, त्यावर राहुल गांधी म्हणाले, भारत जोडो यात्रेदरम्यान, मला लडाखला जायचं होतं, परंतु, काही कारणास्तव ते शक्य झालं नाही. त्यामुळे मी आत्ता इथे आलो आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, लडाखमधील नागरिकांच्या सरकारविरोधात अनेक तक्रारी आहेत.

# केरळात आफ्रिकन स्वाइन फ्लू!

## » डुकरांना मारण्याचा आदेश; 10 किमी परिघात देखरेख

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील कनिचरा गावात आफ्रिकन स्वाइन फ्लूचा एक रुग्ण आढळून आला आहे. त्यामुळे कन्नूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दोन फार्ममधील डुकरांना मारण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय, जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना 18 ऑगस्ट रोजी मल्याळम पाडी भागातील एका खाजगी शेतात स्वाइन फ्लूचा एक रुग्ण आढळून आला. त्यांनी 10 किलोमीटरच्या परिघात शेतातील डुकरांना मारण्याचा आदेश जारी केला. तसेच त्यांना साथीच्या नियमांनुसार दफन करण्यास सांगितले.**




### ही खबरदारी घेतली जात आहे

» जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना आफ्रिकन स्वाइन फ्लूच्या प्रकरणांचा अहवाल देण्यास सांगितले आहे. यासोबतच गेल्या दोन महिन्यांतील बाधित डुकरांना इतर शेतात पाठवल्याचा अहवालही मागवण्यात आला आहे. कोणत्याही गावात आफ्रिकन स्वाइन फ्लू आढळल्यास तात्काळ आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांना कळवण्यास सांगण्यात आले आहे. गावातील पशुवैद्यकीय डॉक्टरांना याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डुक्करांचे फार्म असलेल्या क्षेत्रापासून 1 किमीची त्रिज्या आणि ज्या भागात प्रकरणे आढळली त्या भागापासून 10 किमीची त्रिज्या रोग निगराणी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहे. तसेच डुकराचे मांस विक्री आणि निर्यातीवर तीन महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना आफ्रिकन स्वाइन फ्लूच्या प्रकरणांचा अहवाल देण्यास सांगितले आहे. यासोबतच गेल्या दोन महिन्यांतील बाधित डुकरांना इतर शेतात पाठवल्याचा अहवालही मागवण्यात आला आहे. कोणत्याही गावात आफ्रिकन स्वाइन फ्लू आढळल्यास तात्काळ आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांना कळवण्यास सांगण्यात आले आहे. गावातील पशुवैद्यकीय डॉक्टरांना याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरवर्षी देशभरात आफ्रिकन स्वाइन फ्लू पसरत असल्याच्या बातम्या येतात. यामध्ये हजारो डुकरांचा मृत्यू होतो. गेल्या काही वर्षांत, केरळ व्यतिरिक्त, त्याचा संसर्ग आसाम, बिहार, मध्य प्रदेश, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पसरला होता. देशात सर्वाधिक डुकरांची संख्या आसाममध्ये आढळते. 2022 मध्ये, आफ्रिकन स्वाइन फ्लू आणि तापाची प्रकरणे आता उत्तर-पूर्व आफ्रिका, युरोप, दक्षिण अमेरिका, नागालँड आणि कॅरिबियनच्या काही भागांमध्ये डुकरांमध्ये आढळत आहेत.

# मामावर विश्वास ठेवू नका, काका आले !

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल रविवारी एमपीच्या सतनामध्ये म्हणाले - मला कळले की मध्य प्रदेशात एक मामा आहे. त्यांनी आपल्या भाच्यांची फसवणूक केली आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. आता तुमचे काका आले आहे. काकांवर विश्वास दाखवा. मी शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालये बांधून मध्य प्रदेशातील तरुणांना नोकऱ्या देईन. केजरीवाल यांनी दिल्लीप्रमाणे मोफत वीज, मोफत उपचार आणि शिक्षणासह 10 आश्वासने दिली. त्यांच्यासोबत पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मानही होते. ते म्हणाले- प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाला शिव्या देतो, पण चालत नाही. देश घडवण्यासाठी आलो आहोत. पैसे कमावण्यासाठी आलेलो नाही. याच वर्षी मध्य प्रदेशात विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच भाजपने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान म्हणाले की, आमचे हमीपत्र इतर पक्षांप्रमाणे जाहीरनामा नसून केजरीवाल यांची हमी आहे. ज्याप्रमाणे आई गंगेचा प्रवाह उलटा वाहू शकत नाही. तसेच अरविंद केजरीवाल यांची हमी रिकामी जाणार नाही. त्यात जे लिहिले आहे ते पूर्ण होईल. ते म्हणाले की, पंजाबमधील सरकारच्या एका वर्षात आम्ही 31 हजारांहून अधिक सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत. सरकारवर विश्वास असल्याने मोठ्या कंपन्या गुंतवणूक करत आहेत. 10 दिवसांपूर्वीच 12 हजारांहून अधिक शिक्षकांच्या नोकऱ्या रफमधून निश्चित झाल्या. पगारही तीन पटीने वाढला. मुख्यमंत्री भगवंत मान म्हणाले की, पूर्वी थंडा म्हणजे कोका-कोला, पण आता अंडा मतलब नरेंद्र मोदींची लाईन सुरू आहे. चौथी पास काहीही बोलतात. मध्यरात्री नोट बंद करण्याचा विचार केला, ती बंद केली. नोटेचा रंग तुमच्या जॅकेटसारखा असावा, असं कुणीतरी म्हटलं, तर तसं केलं.

# सनीच्या बंगल्यावर जप्ती तलवार




बॉलिवूड अभिनेता सनी देओल हा त्याच्या 'गदर 2' चित्रपटामुळे चर्चेत आहे. मात्र आता सनीबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. लोकसभा खासदार असलेले अभिनेते सनी देओलला बँक ऑफ बडोदाने नोटीस बजावली पाठवण्यात आली आहे. सनीने बँकेकडून मोठ्या रकमेचे कर्ज घेतल्याचा आरोप आहे. मीडियाने दिलेल्या माहितीनुसार 56 कोटींच्या थकबाकीबाबत बँक ऑफ बडोदाने त्याला ही नोटीस पाठवली आहे. इतकच नाही तर बँक ऑफ बडोदाने सनी देओलच्या व्हिलाच्या लिलावासाठी जाहिरात काढली आहे. या कर्जाच्या जामीनदारामध्ये सनी देओलचे वडील आणि अभिनेता धर्मेंद्र यांचं नाव लिहिण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे. मिळालेल्या वृत्तानुसार सनी देओलने बँकेकडून कर्ज घेतले मात्र त्याने त्याची परत फेड केलेली नाही. त्यामुळे त्याच्या मालमत्तेचा लिलाव होण्याची शक्तता आहे. तर याबाबत बँकेकडून सांगण्यात आले की, सनीवर बँकेचे मोठे कर्ज आहे, ज्याच्या वसुलीसाठी बँकेने आता त्याच्या मुंबईतील मालमत्तेचा लिलाव करण्याची जाहिरात दिली आहे. जाहिरातीत म्हटल्यानुसार, सनी देओलच्या 'सनी व्हिला' या बंगल्याचा लिलाव 25 सप्टेंबरला होणार आहे. त्याच्या बंगल्याच्या लिलावासाठी 51.43 कोटी रुपये किंमत राखीव ठेवली असल्याचा दावा मीडिया रिपोर्टमध्ये करण्यात येत आहे. मात्र याबाबत सनी देओलकडून काहीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. सनी देओलचा चित्रपट 'गदर 2' बॉक्स ऑफिसवर कमाल करत आहे. 11 ऑगस्ट रोजी प्रदर्शित झालेल्या गदर 2 या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाईच्या बाबतीत अनेक रेकॉर्ड मोडले आहेत. 'गदर 2'च्या कमाईचे आकडे पाहता हा सिनेमा बॉलिवूडमधील 'पठाण'लाही टक्कर देईल अशी चर्चा आहे. या चित्रपटाने आता पर्यंत एकूण 335 कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे.

# कंगना मनातलं गेली बोलून!

कंगनाची एखादी पोस्ट म्हणजे कोणता ना कोणता वाद होणारच असे चित्र काही महिन्यांपासून रुढ झाले आहे. कंगना ही नेहमीच तिच्या पोस्टमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. कंगनाला बोलण्यासाठी, परखडपणे व्यक्त होण्यासाठी कोणताही विषय पुरतो. यावेळी मात्र ती जरा वेगळ्या अँगलनं व्यक्त होताना दिसत आहे. कंगनानं चक्क विश्वसुंदरी ऐश्वर्या रॉयचे कौतुक केले आहे. कंगनानं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर ऐश्वर्या रॉयच्या पीएस १ या चित्रपटावर दिलेली प्रतिक्रिया त्यात तिचं केलेलं कौतुक हा चर्चेचा विषय होत आहे. त्या चित्रपटातील एका मुव्ही क्लिपचा व्हिडिओ कंगनानं शेयर केला आहे. त्यात पीएस १ मधील नंदिनी (ऐश्वर्या) ही कुंदवईशी (तृषा) संवाद साधताना दिसते. कंगनानं तो व्हिडिओ शेयर करुन विश्वसुंदरी ऐश्वर्याचं कौतुक केलं आहे. ती म्हणते,

बॉलीवूडमधील गीतकारांनी सोळाव्या वर्षातील अभिनेत्रींच्या सौंदर्याविषयी खूप काही लिहिलं आहे. त्यावर गाणी रचली आहे. मात्र ४० आणि ५० व्या वर्षातील अभिनेत्रींविषयी फार कमी गाणी आपल्याकडे आहे. त्याचे एक कारण या वयातील अभिनेत्री सेन्शुलिटी, सेक्शुलिटी आणि सिडक्शनचे सादरीकरण करण्यात कमी पडतात. असे त्यांना वाटते. मात्र यासगळ्याला ऐश्वर्या रॉय यासगळ्याला अपवाद आहे. तिचं सौंदर्य हे तुम्हाला भुरळ घालणारं आहे. ती केवळ सुंदरच नाही तर स्मार्ट आहे. चतूर आहे. याचे बेस्ट कॉम्बिनेशन म्हणून तिच्याकडे पाहावे लागेल. तिच्या या सगळ्या गुणांसाठी मी तिला दोन फुल मून देईन. अशा शब्दांत कंगनानं ऐश्वर्याची स्तुती केली आहे. तिच्या त्या पोस्टवर नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. ऐश्वर्याच्या सौंदर्याचे लाखो चाहते आहेत. तिच्या फोटोंना आणि व्हिडिओंना मिळणारा प्रतिसादही मोठा आहे. केवळ भारतातच नाहीतर जगभरामध्ये ऐश्वर्यावर होणारा कौतुकाचा वर्षाव मोठा आहे. यात बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंगनानं ऐश्वर्याची केलेली स्तुती चर्चेत आली आहे.



# लग्नाला यायचं हं!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आपचे खासदार राघव चड्ढा यांचा काही दिवसांपूर्वी साखरपुडा झाला होता. त्यानंतर राघव यांना काही जणांनी आता लग्नाची तारीख कधी असा प्रश्न विचारुन भंडावून सोडले होते. यासगळ्यात परिणीती अन् राघव यांच्या लग्नाची तारीख समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून परिणीती ही तिच्या लग्नाच्या बातमीवरुन चर्चेत आली आहे. तिच्या साखरपुड्याच्या फोटोंनी चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. साखरपुड्याला बरेच दिवस उलटले तरी लग्नाच्या तारखेविषयी कोणतीही बातमी न आल्यानं चाहत्यांना प्रश्न पडला होता. त्याबाबतची एक बातमी सध्या नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. परिणीतीचा होणारा पती राघव चड्ढा यांनी देखील दिलेल्या एका प्रतिक्रियेनं सोशल मिडियावर चर्चा होती. मनोरंजन क्षेत्रामध्ये परिणीती आणि राघव चड्ढा यांची जोडी टॉक ऑफ द टाऊन आहे. फोटो आणि व्हिडिओमुळे ते लाईमलाईटमध्ये आहेत. त्यांचे लग्न कधी होणार असा प्रश्न केवळ चाहत्यांनाच नाहीतर बॉलीवूड सेलिब्रेटींना देखील आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परिणीती आणि राघव चड्ढा यांच्या लग्नाची तारीख जाहीर झाली आहे. १३ मे रोजी या दोन्ही सेलिब्रेटींचा साखरपूडा झाला होता.



# "श्रद्धा आणि सबुरी"!

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय मालिका 'आई कुठे काय करते' प्रेक्षकांच्या चांगल्याच पसंतीस उतरली आहे. मालिकेतील सर्वच व्यक्तिरेखांना प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलंय. गेल्या ३ वर्षापासून ही मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. आई कुठे काय करते मालिकेवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलंय आणि आजही मालिका तितकिच लोकप्रिय आहे. आई कुठे काय करते मालिकेचा 1000 वा भाग काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. 7 डिसेंबर 2019 मालिकेचा पहिला भाग प्रदर्शित झाला होता. तेव्हा पासून ही मालिका प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत टीआरपीच्या लिस्टमध्ये पहिल्या तीन स्थानावर ठाण मांडून बसली आहे. 'आई कुठे काय करते' मालिकेचे 1000 भाग पुर्ण झाल्याचा आनंद मालिकेच्या टिमने साजरा केला.

# रजनीच्या जेलरनं 500 कोटींचा टप्पा ओलांडला

जेलर नं सनी देओलच्या गदर २ ला चांगलीच टक्कर देण्यास सुरुवात केली आहे. ९ ऑगस्टला थलायवा रजनीचा जेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. तर ११ ऑगस्टला तब्बल २२ वर्षांनी सनीच्या गदर २ ने थिएटरमध्ये बाजी मारली. यासगळ्यात बॉक्स ऑफिसवर गदर २ ने जेलर पिछाडीवर सोडल्याचे चित्र होते. आता एक मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे बॉक्स ऑफिसवर जेलर हा गदर २ ला चांगलीच लढत असल्याचे दिसून आले आहे. रजनी आणि सनी देओल हे पहिल्यांदाच बॉक्स ऑफिसवर एकमेकांसमोर आले आहेत. याच दरम्यान बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमारचा ओएमजी २ देखील प्रदर्शित झाला आहे. त्यालाही प्रेक्षकांनी पसंत केले आहे. तीनही चित्रपटांचे विषय वेगळे आहेत. गदर २ ची बऱ्याच वर्षापासून प्रतिक्षा होती. सुपरस्टार रजनीकांत यांचा देखील दोन वर्षांनी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यासगळ्यात बॉक्स ऑफिसवर दोन्ही चित्रपटांमध्ये जोरदार फाईट होती. जेलरच्या तुलनेत सनीच्या गदर २ ला स्क्रिन्स जास्त मिळाल्या होत्या. गदर २ चे स्क्रिन टाईम्स देखील वाढवण्यात आले होते. जेलरला मात्र थिएटरसाठी वाट पाहावी लागत होती. यासगळयात रजनीच्या जेलरनं गदर २ ला मागे ढकलले आहे. त्यानं आतापर्यंत पाचशे कोटींचा टप्पा पार केल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. गदरनं ४७० कोटींपर्यंत मजल मारल्याची माहिती आहे. दोन्ही चित्रपटांमध्ये फारसा फरक नसला तरी आगामी काळात रजनीचा जेलर अधिक कमाई करेल असा अंदाज बांधला जात आहे.

# पाकिस्तान ठरतोय डोकेदुखी!

## » वर्ल्ड कपच्या वेळापत्रकात पुन्हा बदल होणार?

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आयसीसी क्रिकेट एकदिवसीय विश्वचषक २०२३ सुरू होण्यास दोन महिन्यांहून कमी कालावधी शिल्लक आहे. मात्र, अजूनही बीसीसीआयची डोकेदुखी काही कमी होताना दिसत नाहीये. पाकिस्तानचा संघ बीसीसीआयच्या अडचणीत भर घालतोय, असे चित्र सध्यातरी दिसत आहे. यावेळचा विश्वचषक भारतात आयोजित केला जात आहे, याची जाणीव सर्वांनाच आहे.**




बीसीसीआय आणि आयसीसीने विश्वचषकाचे वेळापत्रक उशिरा जाहीर केले. त्याचवेळी सुरक्षा आणि इतर कारणांमुळे यानंतर वेळापत्रकात बदल करण्यात आला. आता पुन्हा एकदा हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने सुरक्षेचे कारण देत बीसीसीआय वेळापत्रकात बदल करण्याची विनंती केली आहे.

विश्वचषक २०२३ च्या काही सामन्यांच्या तारखा नुकत्याच बदलण्यात आल्या. अहमदाबाद आणि कोलकाता येथे होणाऱ्या सामन्यांच्या तारखा बदलण्यात आल्या. सणांच्या निमित्ताने या दोन्ही ठिकाणी बदल झाला. आता हैदराबादमध्ये होणाऱ्या सामन्यांची तारीखही बदलली जाऊ शकते. ९ आणि १० ऑक्टोबरला हैदराबादमध्ये सलग दोन सामने होणार आहेत. हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने याबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाशी चर्चा केली आहे. हैदराबाद क्रिकेट असोसिएशन (HCA) ने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (BCCI) कळवले आहे की, हैदराबादमध्ये सलग दोन दिवस विश्वचषकाचे सामने आयोजित करणे त्यांच्यासाठी कठीण होऊ शकते. हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने (एचसीए) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) कळवले आहे की, त्यांना मागील काही दिवसांत विश्वचषक सामने आयोजित करणे कठीण होऊ शकते. ९ ऑक्टोबरला हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर न्यूझीलंड आणि नेदरलँड्स यांच्यात सामना होणार असून त्याच मैदानावर दुसऱ्याच दिवशी श्रीलंकेचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने बीसीसीआयला पत्र लिहिले आहे. असोसिएशनने या दोन सामन्यांमध्ये वेळ मागितला आहे. सुरक्षा व्यवस्था लक्षात घेऊन तारीख बदलली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. दोन्ही सामन्यांमध्ये अंतर नसल्यामुळे हैदराबाद पोलिसांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील सामना हा अधिकाऱ्यांसाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. हा सामना आधी १२ ऑक्टोबरला होणार होता. पण अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर १४ ऑक्टोबरला होणारा भारत-पाकिस्तान सामना पुन्हा नियोजित केल्यानंतर सामना पुढे हलवण्यात आला. जेणेकरून पाक संघाला त्याच्या तयारीसाठी पूर्ण वेळ मिळेल. भारतीय क्रिकेट संघ ८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. विश्वचषकाची तिकिटे अधिकृतपणे २५ ऑगस्टपासून विक्रीसाठी सुरू होतील. हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर ४५ विश्वचषक सामन्यांपैकी फक्त ३ सामने झाले आहेत. यापूर्वी, काही दिवसांपूर्वी, भारत-पाकिस्तान सामन्यासह विश्वचषक २०२३च्या वेळापत्रकात ९ बदल करण्यात आले होते. भारत-पाकिस्तान सामना आधी १५ ऑक्टोबर रोजी होणार होता, परंतु त्या दिवशी नवरात्रोत्सवाचा पहिला दिवस असल्याने गुजरातमधील पोलीस अधिकारी सुरक्षा व्यवस्थेबाबत चिंतेत होते. त्यामुळे हा सामना एक दिवस आधी म्हणजेच १४ ऑक्टोबरला झाला आहे.

### 9 सामन्यांच्या वेळापत्रकात बदल

» १२ नोव्हेंबरला होणाऱ्या पाकिस्तान-इंग्लंड सामन्याबाबतही अशीच परिस्थिती होती कारण त्या दिवशी कोलकात्यात कालीपूजा होणार होती, त्यामुळे हा सामना आता ११ नोव्हेंबरला हलवण्यात आला आहे. टीम इंडिया २०२३च्या विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८ ऑक्टोबर रोजी चेन्नईमध्ये आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. विश्वचषक २०२३च्या तिकिटांची अधिकृत विक्री २५ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. बीसीसीआय आणि आयसीसीने या वर्षी जूनमध्ये वर्ल्ड कप २०२३च्या सामन्यांची घोषणा केली होती. सण आणि इतर काही कारणांमुळे ९ ऑगस्टला भारत-पाकिस्तान सामन्यासह विश्वचषकातील ९ सामन्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला.

# न्यूझीलंडला हरवून यूएईने रचला इतिहास!

## » यूएईचा 17 वर्षीय अयान खान ठरला सामन्याचा हिरो

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**वेगवान क्रिकेटच्या या युगात कोणत्याही संघात कोणालाही हरवण्याची क्षमता आहे. विशेषत: टी२० सामन्यात एकदा संघ मागे पडला की, पुनरागमन करणे कठीण होऊन बसते. असाच काहीसा प्रकार संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि न्यूझीलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी२० सामन्यात पाहायला मिळाला.**

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर उभय संघांमधील सामना खेळला गेला, ज्यामध्ये यूएईने न्यूझीलंडचा ७ गडी राखून पराभव करत क्रिकेट विश्वात मोठा अपसेट केला.

टी२० क्रिकेटमध्ये यूएईसाठी हा विजय मोठे यश म्हणून मानले जाऊ शकते कारण, आयसीसी टी२० क्रमवारीत न्यूझीलंड तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर यूएई १६व्या क्रमांकावर आहे. यूएईला हा विजय अनेक वर्षे स्मरणात राहील. संयुक्त अरब अमिराती (यूएई) ने पहिल्यांदाच टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात न्यूझीलंडला हरवून इतिहास रचला.




यूएई दौऱ्यावर असलेल्या न्यूझीलंडला यूएई विरुद्ध दुसऱ्या टी२० सामन्यात ७ गडी राखून पराभव पत्करावा लागला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० षटकात ८ गडी गमावून १४२ धावा केल्या. धावांचा पाठलाग करताना यूएईने अवघ्या १५.४ षटकांत ३ विकेट्सच्या मोबदल्यात १४४ धावा करत सामना जिंकला. यूएईकडून कर्णधार मोहम्मद वसीम आणि आसिफ खान यांनी शानदार खेळी खेळली.

सलामीवीर कर्णधार वसीमने २९ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ५५ धावा केल्या. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १८९.६६ होता.

त्याचवेळी आसिफ खानने २९ चेंडूत ४८* धावा केल्या. आसिफच्या खेळीत ५ चौकार आणि एका षटकारांचा समावेश होता. याशिवाय तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या वृत्त अरविंदने २१ चेंडूंत २ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने २५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली.

### न्यूझीलंड अडकला फिरकीच्या जाळ्यात

» प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचे फलंदाज यूएईच्या फिरकीसमोर फ्लॉप ठरले. मार्क चॅपमनने संघासाठी ४६ चेंडूत ६३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. चॅपमनच्या खेळीत ३ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. याशिवाय न्यूझीलंडचे सर्व फलंदाज अपयशी ठरले. संघाचे एकूण ७ फलंदाज दुहेरी आकडाही पार करू शकले नाहीत, त्यात डेन क्लीव्हर गोल्डन डकचा बळी ठरला.